INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No. MH-659/13(N)
www.vmsindia.org

# पर्यावरण संरक्षणासाठी पर्यावरणीय अभिवृत्ती व ज्ञानात्मक पातळीचा अभ्यास

सर्जेराव शं. पाटील
बाबासाहेब चितळे महाविद्यालय,भिलवडी

## प्रस्तावना

मानवी जीवन पूर्णपणे निसर्गावर अवलंबून आहे. सर्व जीवसृष्टीचा विकास पर्यावणातील घटकाद्वारेच होतो. निसर्गातील हवा, पाणी, वनस्पती, प्राणी हे मानवाला जगविण्यासाठी अत्यावश्यक आहेत. इतर सर्व घटकापेक्षा मानवाकडे बुध्दीचे सामर्थ्य जास्त आहे व या जोरावरच मानवाने निसर्गावर विजय मिळविण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. आज जगामध्ये निसर्ग घटकांचा अमर्याद वापर केल्याने काही घटक संपुष्टात येतात याचा विचार फारसा केला नाही. शेती व औद्योगिक क्षेत्रात प्रगती घडवून आणताना सर्व जगात पर्यावरण संरक्षणाचा प्रश्न हा अत्यंत गंभीर झाला आहे. तो जर तात्काळ सोडविला गेला नाही तर मानवाचा व पर्यायाने पृथ्वीचा विनाश आहे.

## संशोधनाची उद्दीष्टे

1. बी. ए. भाग 2 च्या विद्यार्थ्यांची पर्यावरणविषयक अभिवृत्ती जाणून घेणे
2. बी. ए. भाग 2 च्या विद्यार्थ्यांची पर्यावरणविषयक ज्ञानात्मक पातळी जाणून घेणे.
3. विद्यार्थ्यांच्या पर्यावरणविषयक अभिवृत्ती व ज्ञानात्मक पातळीच्या विकासासाठी उपाय सूचवणे.

## अभ्यासपध्दती

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये जगाच्या ग्लोबल प्रश्नाचा भौगोलिक अंगाने अभ्यास केला आहे. आकडेवारी प्राथमिक स्वरूपाची आहे काही प्रकाशित ग्रंथ वर्तमान पत्रातील प्रसिध्द लेख यामधून संकलित केली आहे.

विद्यार्थ्यांची पर्यावरणविषयक अभिवृत्ती व ज्ञानात्मक पातळी जाणून घेण्यासाठी डॉ. राजा मणीक्कम यांची ई. ए. सी. एस. (मराठीत रूपांतर) मासिका वापरली आहे. संबंधित मासिकेत एकंदर 40 विधाने असून ती मौखिक बांधिलकी, वास्तविक बांधिलकी, भावनिक बांधिलकी व ज्ञानात्मक पातळी यांच्याशी संबंधित आहे.

भारता सारख्या देशाला हवा प्रदूषणाने ग्रासले आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार भारताचा जगात प्रदूषणाच्या यादित 7 वा कमांक आहे. भारतातील 130 शहरातील हवा मर्यादेपेक्षा जास्त प्रदूषीत असून वहानातून निघणा—या धुरामुळे 57 टक्के हवा प्रदूषण होते. दर वर्षी 10 लाख लोकांचा मृत्यू होतो. मुंबई शहरात वातावरणात दररोज हजार टन प्रदूषित द्रव्य मिसळतात. (38.4 सल्फर डाय ऑक्सॉइड, 34.4 टक्के नायट्रोजन ऑक्सॉईड, 9.8 टक्के हायड्रोकार्बन्स 8.2 अन्य द्रव्य ) मुंबई परिसरात 40 हजार कारखाने व 400000 मोटारी आहेत.

ध्वनी प्रदूषण हे मानवाने स्वतः निर्माण केलेले फार मोठे संकट आहे. मोठया आवाजातील संवाद, लाउडस्पीकर, टेपरेकॉर्डर, वहानाचे भोंगे, कारखान्याच्या यंत्राचा, रेल्वे गाडयांचा, मोटार वाहनाचा, विमानाचा आवाज इ. यामुळे मानसिक स्थितीवर वाईट परिणाम होतो. तसेच शारीरिक मध्ये डोकेदुखी, रक्तदाब, मानसिक ताण इत्यादी.

भारतात नर्मदा, गंगा, यमुना, गोदावरी, कृष्णा, कावेरी, हुबळी, पंचगंगा प्रदूषीत झाली आहे. 2016 मध्ये पुण्याला राजेंद्रसिंह राणा आले होते. त्यांनी मुळा आणि मुठा नदीतील पाणी पिण्यासाठी नव्हे तर शेतीसाठी सुध्दा उपयोगाचे नाही असे सांगितले. मलेरिया, कॉलरा, जुलाब यांमुळे हजारो लोकांचा मृत्यू होतो.

भारतामध्ये प्रचंड लोकसंख्येमुळे पार्यावरणाचे प्रदूषण वाढत आहे. पर्यावरण संरक्षणाच्या संदर्भात जनजागृती प्रयत्न 1950 सालापासून सुरू आहे. 1971 साली पर्यावरणाच्या प्रदूषण संदर्भातील अहवाल ( ठतपजपेी त्वलंस ब्वउउपेपवद वद म्दअपतवदउमदजंस च्वससनजपवद ) ने म्हटले आहे की पर्यावरणाच्या संदर्भातील पहिली बांधिलकी ही जनतेच्यावतीने हवा पाणी यांचे संरक्षण करणे तेंव्हापासून आजपर्यंत मानव पर्यावरण संरक्षण करत आहे.

पर्यावरण शिक्षणाची निर्मिती गरजेतून झाली आहे. पर्यावरणाचे प्रचंड प्रमाणावर झालेले नुकसान भरून काढण्यासाठी आवश्यक ते ज्ञान कौशल्य, अभिवृत्ती, संवेदनशिलता विद्यार्थ्यामध्ये निर्माण करणे पर्यावरण शिक्षणाचे उद्दिष्ट आहे.

## संशोधन समस्येचे महत्व

आपल्या दैनंदिन वर्तमानावर सर्वात जास्त प्रभाव आपल्या अभिवृत्तीचा असतो. एखाद्या गोष्टीकडे पहाण्याचा कल म्हणजे अभिवृत्ती किंवा व्यक्तिच्या भावना, विश्वास, पूर्वग्रह, यांचे संघटन म्हणजे अभिवृत्ती. व्यक्तिची अभिवृत्ती जाणून

घेतल्यानंतर भविष्यातील वर्तनासंबंधी कथन करता येते. आजच्या विद्यार्थ्यांच्या पर्यावरणाच्या संदर्भात अभिवृत्ती कशी आहे समजले तर पर्यावरण विषयक धोरण ठरविणे सोपे जाईल तसेच विद्यार्थ्यांच्या अभिवृत्तीला योग्य वळण लावता येईल. तसेच त्यांची पर्यावरणविषयक ज्ञानाची पातळी किती आहे हे समजून घेणे हा प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय आहे. डॉ. पचौरी म्हणतात हवामान बदल रोखण्यासाठी अतिशय अग्रक्रमाने कृती करण्याची गरज आहे. $2^0$ ब तापमान वाढीची मर्यादा राखण्याची संधी आहे.

निष्कर्ष

1. बी. ए. भाग 2 च्या विद्यार्थ्यांची पर्यावरणविषयक अभिवृत्ती होकारात्मक आहे.
2. विद्यार्थ्यांची पर्यावरणविषयक मौखिक बांधिलकी दिसून येते. तसेच पर्यावरणाचे प्रश्न सोडविण्याच्या संदर्भात आपली बांधिलकी असल्याचे व्यक्त करतात.
3. सर्व विद्यार्थ्यांची पर्यावरण प्रश्न सोडविण्यासाठी प्रत्यक्ष कृती करण्याची तयारी आहे. तसेच पर्यावरणाला इजा होईल अशी कोणतीही कृती करण्यास ते नकार देतात.
4. सर्व विद्यार्थ्यांचे पर्यावरणविषयक ज्ञान कमी आहे असे दिसते.

सूचना

विद्यार्थ्यांची अभिवृत्ती होकारात्मक असल्यामुळे खालील जनजागृतीचे विविध उपक्रम राबविता येतील.

1. सायकल रॅली काढून पर्यावरणासंबंधी जनजागृती करणे.
2. निसर्ग मंडळ स्थापून स्थानिक पातळीवर प्रत्यक्ष कृती करा.
3. दुर्मिळ वनस्पती व प्राण्यासंबंधी माहिती देणे.
4. पोस्टर प्रदर्शन.
5. व्हीडीओ कॅसेट शो.
6. पर्यावरण शिबीरे.
7. सर्वेक्षण पहाणी मुलाखती.
8. स्वच्छता व आरोग्य यांचे महत्व स्पष्ट करणे.
9. विद्यार्थ्यांचे ज्ञान वाढविण्यासाठी विविध तंज्ञाची व्याख्याने आयोजित करणे.
10. वाहनात स्ण्च्ळण वाढल्यावर $ब्व_2$ कमी होईल.
11. नैसर्गिक शेतीची माहिती देणे.
12. मोठया प्रमाणात वृक्ष लागवड केली पाहिजे.
13. खनिज तेलाला पर्याय ठरू शकतील अशा उर्जा साधनांचा वापर करणे.

संदर्भ पुस्तके

1. गाथा पर्यावरणाची, अभिजीत घोरपडे राजहंस प्रकाशन, पुणे.
2. पर्यावरण अभ्यास, प्रा. डॉ. सावंत, फडके प्रकाशन, कोल्हापूर. 2015
3. पर्यावरण अभ्यास, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर. 2012
4- Nature Conservancy www. Nature.org
5- Carban fund org www. Carborund.org
6- http\mumbaimania in 2016
7- www. nationalgeographic.com